महाराष्ट्र शासन

# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

## संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

## मध्यवर्ती कार्यालये, पुणे-४११००१

## जाहिरात क्रमांक-०२/२०२३

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे/कोकण/नागपूर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती विभागातील शिपाई (गट-ड) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा महाराष्ट्र शासनाच्या www.urban.maharashtra.gov.in व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. २०/०९/२०२३ रोजी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या http://ese.mah.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

* **रिक्त पदांचा तपशील**

| पदाचे नाव | संवर्ग | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|
| शिपाई | गट-ड | वेतनस्तर : एस-०१, रु. १५०००-४७६००<br>अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते | १२५ |

**शिपाई गट-ड संवर्गातील भरावयाच्या पदांचा विभागनिहाय सविस्तर तपशील संकेतस्थळावर परिशिष्ट-१ तसेच अभ्यासक्रम परिशिष्ट-२ मध्ये प्रसिद्ध केल्याप्रमाणे आहे.**

**टीप :** १) वरील राखीव/बिनराखीव तसेच एकूण पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच संवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करून पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

२) परिशिष्ट-१ मध्ये नमूद विभागनिहाय रिक्त पदांपैकी ०४ पदे ही शासन नियमानुसार दिव्यांगांच्या खालील प्रवर्गासाठी प्रत्येक गटासाठी (a,b,c) पुढीलप्रमाणे पदे आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

| | |
|---|---|
| (a) | अंध/अल्पदृष्टी (B, LV) (Blind/Low vision) : २ पदे |
| (b) | कर्णबधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता (D-Deaf, HH-Hard of Hearing) :- 1 पद |
| (c) | अस्थिव्यंगता (OL, OAL)/ मेंदुचा पक्षाघात (CP-Cerebral Palsy) /कुष्ठरोग मुक्त (LC - Leprasy cured) /शारीरिक वाढ खुंटणे (DW-Dwarfism)/आम्ल हल्लाग्रस्त (AAV-Acid Attack Victims) :- 1 पद |

* **सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता :-**

| पद | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| शिपाई (गट-ड) | माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण |

* उक्त पदासाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

* **वयोमर्यादा :-**

१) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी / भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहील.) तसेच दिव्यांग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. शासन निर्णय क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि. २०-८-२०१० मधील तरतुदीनुसार माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत विहित वयोमर्यादेतील सूट ही त्यांचा सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

२) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन कर्मचारी आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेबाबतची कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

* **परीक्षा शुल्क :-**

| पदनाम | अराखीव (खुला) प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| शिपाई (गट-ड) | १०००/- | ९००/- |

उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.
माजी सैनिकांसाठी परीक्षाशुल्क आकारले जाणार नाही.

* प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदभरती संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पद्धत, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ.बाबतचा तपशील www.urban.maharashtra.gov.in, www.dtp.maharashtra.gov.in व http://ese.mah.nic.in या संकेतस्थळावरील ''सर्वसाधारण सूचना'' मध्ये लिंक प्रसिद्ध करतेवेळी उपलब्ध करून देण्यात येईल.

* भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.urban.maharashtra.gov.in, www.dtp.maharashtra.gov.in व http://ese.mah.nic.in या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. याबाबत उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरून माहिती उपलब्ध करून घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

* स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

**दिनांक :- ११ ऑगस्ट, २०२३**
**ठिकाण :- पुणे,**

**सही/-**
**(रा. म. पवार)**
**अध्यक्ष**
**राज्यस्तरीय निवड समिती, पुणे (गट-ड)**
**तथा**
**सहसंचालक, नगर रचना**
**पुणे विभाग, पुणे**

(Dgipr No. 2023-24/क्र.5/C-2844)